**<u>विशेष दिवाणी दावा क्र. ३२/२००७ मधील निशाणी २८९ वरील आदेश</u>**
**<u>(विक्रमसिंग देशमुख विरुध्द दिलीपराव शिंदे वगैरे)</u>**
**<u>CNR No.MHSN050014452007</u>**

प्रस्तुत अर्ज वादीतर्फे साक्षीदार यांनी कागदपत्रं अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षाचा युक्तिवाद ऐकला. वादीचे विद्वान विधिज्ञांनी असे प्रतिपादन केले की, दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. ५ ने घेतलेल्या कर्जासंदर्भातील कागदपत्रं उभय पक्षातील वाद निराकरणाकरीता उपयुक्त असून त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. याउलट, प्रतिवादी क्र. ५, ६ व ९ चे विद्वान विधीज्ञांनी असे प्रतिपादन केले की, अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा दाव्यातील अनुतोषाशी काहीही संबंध नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रतिवादी क्र. ४ ते ६ व ८ यांच्याशी संगनमत करुन दिनांक ०२/०९/२००४ रोजी करुन घेतलेल्या खरेदीखतास वादींनी आव्हान दिल्याचे दिसते. मान्य आहे की, मुळ दावा सन २००७ मध्ये दाखल केला असून सन २००४ मधील खरेदीखत रद्द होण्याबाबत अनुतोष मागितला आहे. परंतु, वाद मिळकतीवर प्रतिवादी क्र. ५ ने कर्ज काढल्याची बाब लक्षात घेता त्यासंदर्भात भविष्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी वादीस पुरावा सादर करण्याची संधी देणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत अर्जासोबत जोडलेली कागदपत्रं सन २०२४ मधील असली तरी उभय पक्षातील वाद निराकरणाकरिता उपयुक्त ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, अर्ज मंजूर करण्यायोग्य आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

कागदपत्र दाखल करुन घेण्यापुरता अर्ज मंजूर करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2025.08.05 13:10:30 +0530

**इस्लामपूर.** **(भगवान म. कारलेकर)**
**दिनांक - ०४/०८/२०२५.** **सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | – | सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | – | ०४/०८/२०२५ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | – | ०५/०८/२०२५ |